शिल्पकार विकासाचा...

# देशदूत

जळगाव | वर्ष २८ । अंक ६१ । सोमवार, दि.२४ फेब्रुवारी २०२५ । पाने-८ | किंमत ₹ ५

## दुबईत हार्दिक, कुलदीपचा जलवा

# पाकचा खेळ खल्लास

## भारताचा ‘विराट’ विजय







### विराटचे नाबाद शतक : विजयी चौकार

**दुबई ।** येथे चॅम्पियन स्पर्धेसाठी रविवारी झालेल्या भारत–पाकिस्तानच्या रोमहर्षक सामन्यात भारताने दमदार विजय मिळवत उपान्त्य फेरीत प्रवेश केला आहे. याचवेळी न्यूझिलंडसोबत पराभूत झालेल्या पाकिस्तानचा भारताने पराभव केल्याने यजमान पाकिस्तानच चॅम्पियन चषकाच्या बाहेर फेकला गेला आहे. पाकिस्तान फलंदाजी करीत असतांना भारतीय गोलंदाजांनी त्यांना अक्षरश: सडो की पळो करुन सोडले. कुलदीप व हार्दिकसह रवींद्र जडेजानेदेखील पाकला रंजीश केले. या सामन्यामध्ये विराट कोहलीने नाबाद १०० धावा करत विजयी चौकार लगावला. २४१ धावांचा पाठलाग करतांना भारतीय संघाने ४२.३ षटकातच हा सामना जिंकला.



पाकिस्तानचा प्रमुख गोलंदाज शाहीन शाह अफ्रिदी याने टीम इंडियाला मोठा झटका दिला . शाहीनने कर्णधार रोहित शर्मा याला पाचव्या ओव्हरमधील सहाव्या बॉलवर क्लिन बोल्ड केलंय. रोहितने १५ बॉलमध्ये १ सिक्स आणि ३ फोरसह २० रन्स केल्या

रोहित शर्माला पाचव्या षटकात शाहीन आफ्रिदीने क्लीन बोल्ड करत भारताला धक्का दिला. पण पुढच्या षटकात शुबमन गिलने रोहितच्या विकेटचा व्याजासकट बदला घेतला आहे. शुबमन गिलने सातव्या ४ षटकात चौकार लगावत १४ धावा केल्या. यासह गिलने भारतावरचा दबाव करत त्यांच्या विकेट घेणाऱ्या गोलंदाजाची धुलाई केली.वेळी विराट कोहलीने आणखी एक ऐतिहासिक विक्रम आपल्या नावावर केला आहे. विराटने आज चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरचा विक्रम मोडला . एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वात जलद १४ हजार धावा करणारा कोहली जगातील पहिला खेळाडू बनला आहे. कोहलीने २९९व्या एकदिवसीय सामन्याच्या २८७व्या डावात ही चमकदार कामगिरी केली. चॅम्पियन्स ट्रॉफीच्या पहिल्या पान २ वर

गेल्या अनेक दिवसांपासून फॉर्ममध्ये येण्यासाठी झुंजत असलेल्या विराट कोहलीची बॅट या सामन्यात तळपली. तर श्रेयस अय्यरनेदेखील अर्धशतक करीत त्याला साथ दिली. त्यामुळे भारताने २४२ धावांचा टप्पा सहज पार केला.

या सामन्यात गरमागरमी पाहिला मिळाली, सामन्यात कर्णधार मोहम्मद रिझवान भारतीय गोलंदाज हर्षित राणाशी भिडला. भारतीय संघाकडून हर्षित राणाने २१ वे षटक टाकले. या षटकाच्या

### रिझवान-राणा मैदानात भिडले

शेवटच्या चेंडूवर मोहम्मद रिझवानने एक सरळ स्ट्रोक खेळला आणि नंतर धाव घेताना त्याने भारतीय गोलंदाजाला जोरात धक्का दिला. यामुळे दोन्ही खेळाडूंचा खांद्याला खांदा धडकला. त्यानंतर हर्षितने हातवर केला आणि रिजवानला रागाने काहीतरी म्हटले. यानंतर लगेचच, कॅमेरा मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीरवर गेला.

### विराटची बाबरच्या पाठीवर थाप अन् चाहत्यांचा वाढला आवाज

टीम इंडियाचा स्टार फलंदाज विराट कोहलीने पाकिस्तानचा माजी कर्णधार बाबर आझमच्या पाठीवर थाप देताना पाहायला मिळाला आहे. पाकिस्तानच्या खेळाडूंनी भारतीय खेळाडूंना भेटू नये आणि मिठीही मारु नये असे आवाहन त्यांच्या चाहत्यांनी केले होते. मात्र, तरीही पाकिस्तान फलंदाजीसाठी मैदानात उतरताच विराट कोहली आणि बाबर आझम यांनी एकमेकांशी बोलून एकमेकांना शुभेच्छा दिल्या. त्यांनतर विराटने त्याच्या पाठीवर थाप मारली.तसेच बाबर आझमनेही शुभेच्छा दिल्या. त्यामुळे या हृदयस्पर्शी क्षणाचा फोटो चाहत्यांनी त्यांच्या सोशल मीडियावर शेअर केला.

## संपादकीय

### संवर्धन गरजेचेच

महाराष्ट्राला गडकिल्ल्यांचा संपन्न वारसा आहे. छत्रपतींच्या कर्तृत्वाची, इथल्या मातीतील पराक्रमाची आणि तो वारसा समर्थपणे पेलणाऱ्या असंख्य वीर व्यक्तिमत्त्वांची साक्ष देतात. ११ किल्ल्यांना जागतिक वारसा स्थळांच्या यादीत स्थान मिळवण्यासाठी सरकारी पातळीवर प्रयत्न सुरु आहेत. अनेक किल्ले स्थापत्यकलेचा अप्रतिम नमुना आहेत. किल्ल्यांवर अतिक्रमणाचा मुद्दा अधून-मधून चर्चेत असतो. किल्यांवरील अतिक्रमण काढण्यासाठी सरकारने कृती दल (टास्क फोर्स) स्थापन केले असून अतिक्रमणे काढणार असल्याचा पुनरुच्चार मुख्यमंत्र्यांनी नुकताच केला. किल्ले शिवनेरीवर शिवजन्मोत्सव प्रसंगी ते बोलत होते. हा मुद्दा याआधीही अनेकदा वादाचा बनलेला आढळतो. अनेक किल्ल्यांवर अतिक्रमणे असल्याचा दावा केला जातो. ते काढण्यासाठी आंदोलन झडतात. निधीही मंजूर केल्याचे वृत्त माध्यमात झळकते. पण पुढे काय होते ते लोकांना कधीच का कळत नसावे? वास्तविक गडकिल्ले पराक्रमचा इतिहास सांगतात. मनावर घेतले तर सामान्य माणसेही क्रांती घडवू शकतात याचा विश्वास पेरतात. अशा वारशावर कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण होणे कायदेशीर नाही. किल्यांचे संवर्धन केले जायला पाहिजे ही लोकांची अपेक्षाही त्या अर्थाने गैर नाहीच. काळाचा मारा सहन करत किल्ले वर्षानुवर्षे उभे आहेत. त्याकारणे त्यांची पडझड होणे स्वाभाविक मानले जाऊ शकेल. अतिक्रमण मात्र नाही. तथापि त्यांच्या संवर्धनाची आणि अतिक्रमण मुक्त करण्याची आठवण फक्त निमित्तानेच येत असावी का? कारण संवर्धन ही सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे. युवांनी, विद्यार्थ्यांनी गडकिल्ले फिरुन पराक्रम जाणून घेण्यासाठी ते सुस्थितीत असायला हवेत. त्यामुळे नव्याने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी सरकार करेल का? तसे झाले तर या मुद्यावरुन राजकारणाला संधी मिळू शकणार नाही. युवांची माथी फिरवण्याला पान २ वर




नवी दिल्ली । दिल्लीच्या नवनिर्वाचित मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली व विविध विषयांवर चर्चा केली.

## किल्ल्यांना जागतिक वारसा दर्जा मिळणार!

### शेलारांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळ पॅरिसला रवाना

**मुंबई ।** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या १२ किल्ल्यांना युनेस्कोचा जागतिक वारसा दर्जा मिळवण्यासाठी महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांच्या नेतृत्वाखाली एक शिष्टमंडळ रविवारी पॅरिसला रवाना झाले.



या दौऱ्यात शिवाजी महाराजांच्या किल्ल्यांना जागतिक वारसा दर्जा मिळविण्यासाठी आवश्यक तांत्रिक आणि राजनैतिक सादरीकरण करण्यात येईल. यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांच्या गड-किल्ल्यांना जागतिक स्तरावर ओळख मिळण्यास मदत होईल. तसेच महाराष्ट्रातील सांस्कृतिक वारशाचे महत्त्व अधोरेखित होईल, असा विश्वास शेलार यांनी व्यक्त केला आहे.

महाराष्ट्र शासनाने मराठा लष्करी भूप्रदेश या संकल्पनेअंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या १२ किल्ल्यांना युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समावेश करण्यासाठी प्रस्ताव सादर केला आहे. या किल्ल्यांमध्ये रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, खांदेरी किल्ला आणि तमिळनाडूतील जिंजी किल्ला यांचा समावेश आहे. याबाबतचे सादरीकरण पूर्ण क्षमतेने प्रभावीपणे करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र पान २ वर



## राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन ३ मार्चपासून

**मुंबई ।** येत्या ३ मार्चपासून सुरू होणारे राज्य विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन साडेतीन आठवडे म्हणजे २६ मार्चपर्यंत चालणार असल्याचे रविवारी स्पष्ट झाले. या अधिवेशनात १० मार्च रोजी राज्याचा सन २०२५-२६ या वर्षाचा अर्थसंकल्प सादर केला जाणार आहे.

विधिमंडळ अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर आज विधानभवनात विधानपरिषद आणि विधानसभा कामकाज सल्लागार समितीची बैठक पार पडली. या बैठकीत अधिवेशनातील कामकाजाबद्दल चर्चा करण्यात आली.अर्थसंकल्पीय अधिवेशन कालावधीत शनिवार, ८ मार्च रोजी सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी विधिमंडळाचे कामकाज सुरू राहील. तर १३ मार्च रोजी होळीपौर्णिमेच्या निमित्त दोन्ही सभागृहाचे कामकाज होणार नाही. त्यामुळे अधिवेशनाच्या दुसऱ्या आठवड्यात फक्त तीन दिवस कामकाज होणार आहे. कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीला विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

### विरोधी पक्षनेतेपद देणार काय?

विधानसभा निवडणुकीत काँग्रेस, शरद पवारांची राष्ट्रवादी व ठाकरेंची शिवसेने या तिघांपैकी एकालाही अपेक्षित यश मिळाले नाही. त्यामुळे विरोधी पक्षनेते महायुतीचे सरकार अर्थात देवेंद्र फडणवीस काँग्रेस किंवा शिवसेनेला विरोधी पक्षनेते पद देणार काय? याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरु झाली आहे.

### केळी भाव

नवती (१) : 1975
नवती (२) : 1775

### मिश्किली




## काही लोक हिंदूंच्या श्रद्धांचा द्वेष करतात!

### पंतप्रधान नरेंद्र मोदींचे बागेश्वर धाममध्ये प्रतिपादन



**बागेश्वर धाम ।** बंधूंनो, आजकाल काही नेत्यांचा एक गट तयार झाला आहे, जे धर्माची खिल्ली उडवतात. हिंदूंच्या श्रद्धांचा द्वेष करतात. आपल्या श्रद्धा, संस्कृती आणि मंदिरांवर हल्ला करतात आणि आपल्या सणांबद्दल आणि परंपरांबद्दल अपशब्द बोलत असतात.असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी बागेश्वर धाम येथे केले.

त्यांनी येथे बालाजी मंदिरात पूजा केली. यानंतर, व्यासपीठावरून बटन दाबून बागेश्वर धाम मेडिकल अँड सायन्स रिसर्च इंस्टिट्यूटचे भूमिपूजन केले. या रुग्णालयाचा कर्करोग पीडीत आणि इतर आजारांनी ग्रस्त असलेल्या रुग्णांना मोठा लाभ होईल. यावेळी मोदी म्हणाले, माझे छोटे बंधू धीरेंद्र शास्त्री लोकांना जागरूक करत असतात. एकतेचा मंत्र देत असतात. आता त्यांनी हे कर्करोग रुग्णालय उभारण्याची जबाबदारीही घेतली आहे. अर्थात आता बागेश्वर धाममध्ये भजन, भोजन आणि निरोगी जीवनाचा आशीर्वादही मिळेल. या कामासाठी मी धीरेंद्र शास्त्री यांचे अभिनंदन करतो. यावेळी, बागेश्वर सरकार धीरेंद्र कृष्ण शास्त्री आणि मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव देखील उपस्थित होते. बागेश्वर धाम मध्य प्रदेशातील छतरपूर जिल्ह्यात आहे.

### यावेळी बालाजींनी बोलावले

पंतप्रधान मोदी म्हणाले, मला फार कमी दिवसांतच दुसऱ्यांदा वीरांची भूमी असलेल्या बुंदेलखंडात येण्याचे सौभाग्य लाभले. यावेळी थेट बालाजींकडूनच बोलावणे आले. हनुमानजींच्या आशीर्वादाने, हे श्रद्धेचे केंद्र आता आरोग्याचे केंद्र बनणार आहे. मी येथील बागेश्वर धाम कर्करोग वैद्यकीय आणि विज्ञान संशोधन संस्थेचे भूमिपूजन केले. ही संस्था १० एकर एवढ्या परिसरात असेल. पहिल्या टप्प्यातच येथे १०० खाटांची सुविधा मिळेल. याबद्दल मी बुंदेलखंडच्या जनतेचे अभिनंदन करतो. बागेश्वर धामचे हे नवीन रुग्णालय २५२ कोटी रुपये खर्चून बांधले जाणार आहे. हे रुग्णालय २.३७ लाख चौरस फूट जागेत बांधण्यात येणार आहे. या इमारतीत नैसर्गिक प्रकाश आणि कमीत कमी आवाज असेल. तसेच या रुग्णालयाचा आकार पिरॅमिडसारखा असेल.

जळगाव ■ जळगाव ■ धुळे ■ नंदुरबार ■ नाशिक ■ अहमदनगर येथून एकाच वेळी स्वतंत्रपणे प्रकाशित www.facebook.com/deshdoot www.instagram.com/deshdoot twitter.com/deshdoot Youtube : Daily Newsgram

cmyk